# स्मरणपत्र - १

उपआयुक्त (झोनिपु )कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. झोनिपु/३/२९०८
दिनांक - ५/१/२०१९

प्रती,
मा.सर्व खातेप्रमुख
पुणे महानगरपालिका.

याजकडेस..

**विषय-** पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर माहिती अधिकार अधिनियम २००५ चे अंतर्गत प्रसिध्द करावयाची माहिती.(कलम-४)

**संदर्भ-** १)सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण२०१५/प्र.क्र. (२५२/१५) सहा.मंत्रालय मुंबई ४०००३२ दि.२८.१.२०१६
२)उपआयुक्त (झोनिपु)जा.क्र.३/६६१दि.१४/६/२०१८.

पुणे महानगरपालिकेचे संकेतस्थळावर माहिती अधिकार अधिनियम २००५ चे अंतर्गत कलम ४ मध्ये नमूद बाबींची माहिती वर्षातून दोनदा म्हणजेच दि.१ जानेवारी व १ जुलै रोजी अदययावत करून प्रसिध्द करणे बंधनकारक आहे . याबाबत वेळोवेळी उपआयुक्त (झोनिपु) हे समन्वयक असले कारणाने आमचे कार्यालयामार्फत वेळोवेळी कार्यालय परिपत्रक प्रस्तृत करून सूचित करण्यात आले आहे. तरी प्रत्येक विभागाने कलम ४ ची माहिती अदयायावत करून पुणे महानगरपालिकेचे संकेतस्थळावर दि.६ जानेवरी २०१९ रोजी प्रसिध्द करणे तसेच सदरची माहिती प्रसिध्द केलेबाबत या पत्राचे मागील बाजूस असलेल्या नमुना प्रमाणे उपआयुक्त झोनिपु कार्यालयास तातडीने कळविणे आवश्यक होते. अद्याप परिमंडळ क्र.२,परिमंडळ क्र.४,आस्थापना विभाग, उपआयुक्त (झोनिपु)विभाग वगळता अन्य विभागाकडून वरीलप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.सदरची माहिती प्रसिध्द न करणे ही गंभीर स्वरूपाची बाब असून त्या संदर्भात नागरिकांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत सबब ज्या खात्याचे सदर प्रमाणपत्र प्राप्त होणार नाही त्या खात्यांची नावे पुढील योग्य त्या कारवाईसाठी मा.अति.महा.आयुक्त यांचेकडे सादर करण्यात येतील त्याबाबतचे आदेश मा.महापालिका आयुक्त यांनी पारित केले आहेत.

सदरची माहिती पुणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.punecorporation.org वर प्रत्येक विभागाने आपले स्तरावर प्रसिध्द करणेसाठी यापूर्वीच माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत प्रत्येक विभागास युजरनेम व पासवर्ड देण्यात आले आहेत.

तरी वरिलप्रमाणे माहिती तात्काळ अदयायावत करून पुणे महानगरपालिकेचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

कळावे,

संजय रांजणे

संजय रांजणे 5.1.19

प्र.उपआयुक्त

झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन

तथा समन्वयक माहिती अधिकार

पुणे महानगरपालिका

5.1.19

टीप:-प्रमाणपत्र नमुना खालीलप्रमाणे आहे.

खात्याचे नाव

जा.क्र.

दिनांक

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, --------------------------------कार्यालय पुणे महानगरपालिका यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ४ (१ ते १७ बाबी) ची दि.१.७.२०१८ ची माहिती अदययावत करून पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

खातेप्रमुख